मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# शहराच्या विकासासाठी पुन्हा संधी द्या; अजित पवार

## महापालिका निवडणुका होईपर्यंत पालिकेचा कारभार हर्डीकर यांच्याकडेच; पालकमंत्र्यांनी केले स्पष्ट

**पिंपरी | प्रतिनीधी**

पिंपरी चिंचवड शहरामध्ये 1992 ते 2017 या कालावधीत राष्ट्रवादी काँग्रेसच्या माध्यमातून एकहाती कारभार केला. पाण्याचे व्यवस्थापन, रस्ते, उड्डाणपूल उभारून शहराचा विकास केला. त्यामुळे नागरिकांनी पुन्हा संधी द्यावी असे आवाहन राज्याचे उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्हा पालकमंत्री अजित पवार यांनी बुधवारी केले. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांना महायुतीच्या माध्यमातूनच सामोरे जाण्याची अपेक्षा देखील त्यांनी यावेळी व्यक्त केली.




उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली चिंचवड येथे आज जनतेच्या स्थानिक तक्रारींवर थेट तोडगा काढण्यासाठी ‘जनसंवाद’ कार्यक्रम संपन्न झाला. चिंचवडमधील या उपक्रमात आज सुमारे ३ हजार तक्रारी नोंदविण्यात आल्या, त्यापैकी तब्बल १२०० तक्रारींचे निराकरण तत्काळ करण्यात आले. इतर प्रकरणांवर संबंधित विभागांकडून कार्यवाही सुरू आहे.

यानंतर माध्यमांशी बोलताना पवार म्हणाले, राष्ट्रवादी काँग्रेसची सत्ता असताना शहरात चांगली कामे केली. त्यामुळे पुन्हा संधी द्यावी, आता आम्ही महायुतीमध्ये आहोत. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत महायुती असावी आमची अपेक्षा आहे.' पवार पुढे म्हणाले.

माझ्या नेतृत्वाखाली सहकाऱ्यांनी १९९२ पासून २०१७पर्यंत पिंपरी-चिंचवड महापालिकेत चांगले काम केले. त्यावेळी अनेक वर्षे विरोधी पक्षनेता कोण असावा, हे देखील मीच ठरवत होतो. विरोधकांना विश्वासात घेऊन निर्णय घेत होतो. खेळीमेळीच्या वातावरणात महापालिकेचे कामकाज केले. टोकाचे मतभेद निर्माण होऊ दिले नाहीत. विरोधी पक्षाच्या नगरसेवकांची देखील कामे केली आहेत. तसेच 'भामा आसखेड, आंध्र धरणातील पाणी आरक्षित केले. पवना बंदिस्त जलवाहिनी प्रकल्प नियोजित केले. शहराची लोकसंख्या वाढत आहे. त्यामुळे पवना बंदिस्त जलवाहिनी प्रकल्प सुरू करून पाणी आणावे लागणार आहे,' असेही ते म्हणाले. हिंजवडीतील कामांना गती दिली आहे. बेशिस्त अवजड वाहनांवर कारवाईच्या सूचना दिल्या जातील, असे पवार यांनी सांगितले.

### महापालिका निवडणुकीनंतर नवीन आयुक्त

» महापालिकेचे आयुक्त असलेले शेखर सिंह यांची राज्य शासनाने बदली केली. त्यांच्याकडे नाशिक कुंभमेळ्याची जबाबदारी दिली आहे. महापालिकेचे आयुक्त म्हणून काम केलेले महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर यांच्याकडे आयुक्तपदाचा अतिरिक्त पदभार दिला आहे. महापालिका निवडणूक होईपर्यंत त्यांच्याकडेच पदभार राहील. निवडणूक झाल्यानंतर महापालिकेला नवीन आयुक्त दिला जाईल, असेही पवार यांनी सांगितले.

तत्पूर्वी पवार यांनी कुंजीर चौक, पिंपळे सौदागर परिसरातील वाहतूक आणि रस्ते समस्यांचा सविस्तर आढावा घेतला. अतिक्रमण, पार्किंग व महावितरण संबंधित तक्रारींबाबत तातडीने कार्यवाहीचे निर्देश दिले. नागरिकांना होणारा त्रास दूर करण्यासाठी आणि वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी संबंधित विभागांना तातडीने उपाययोजना करण्याच्या सूचना केल्या.

**फुटपाथवर कोणाचीही गाडी असेल थेट उचला**

पदपथावर वाहने उभी केली जातात. त्यामुळे कोंडीत भर पडते. कोणी दमदाटी केली तर कोणाचे ऐकायचे नाही. कोणाचीही मोटार, वाहने उभी केली असली तरी कारवाई करावी. आम्ही लावलेली वाहने असली तरी उचलावीत असे निर्देश अजित पवार यांनी दिले. गृहनिर्माण सोसायटी, झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पात घर मिळण्यास विलंब होणे असे विविध प्रश्न घेऊन नागरिक जनसंवादमध्ये आले आहेत. अजित पवार संबंधित अधिकाऱ्यांना व्यासपीठावर बोलावून घेत प्रश्न मार्गी लावण्याचे निर्देश देत आहेत.

# इंद्रायणीनगरमधील रस्त्यांचे काम तातडीने हाती घ्या

## भाजपाचे इंद्रायणीनगर मंडलाध्यक्ष शिवराज लांडगे यांनी आयुक्त हर्डीकर यांना दिले निवेदन

**पिंपरी | प्रतिनीधी**

इंद्रायणीनगर प्रभाग क्रमांक आठमधील सेक्टर 9, 11, 13 येथील सर्विस रोड तसेच सेक्टर 4, 12 व एमआयडीसी परिसरातील रस्त्यांची दुरावस्था दूर करून आवश्यक नागरी सुविधा तातडीने उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी भाजपाचे इंद्रायणीनगर मंडलाध्यक्ष शिवराज लांडगे यांनी आयुक्त व प्रशासक श्रावण हर्डीकर यांच्याकडे केली आहे.

महानगरपालिका प्रशासनामार्फत आमदार महेशदादा लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली विविध विकासकामांना चालना मिळत आहे. मात्र इंद्रायणीनगरमधील काही रस्त्यांची स्थिती अत्यंत खराब असून, याकडे लक्ष देणे गरजेचे आहे. विशेषतः स्पाईन रोडलगतच्या सेक्टर 9, 11 आणि 13 मधील सर्विस रोडवर मोठ्या प्रमाणात खड्डे पडले असून, पावसाळ्यात पाणी साचल्यामुळे अनेक अपघात घडले आहेत. यामुळे विद्यार्थी, महिला आणि नागरिकांच्या दैनंदिन प्रवासात अडथळे निर्माण होत आहेत.



### एमआयडीसी परिसरात बस थांबांची व्यवस्था करा

» एमआयडीसी परिसरातील रस्त्यांची देखील तातडीने डागडुजी व डांबरीकरण करणे आवश्यक आहे. या परिसरात सार्वजनिक वाहतुकीसाठी बस थांब्यांची सुविधा अद्याप उपलब्ध नसल्यामुळे नागरिकांना मोठ्या गैरसोयींना सामोरे जावे लागत आहे.या सर्व नागरी समस्यांवर तातडीने उपाययोजना करून कामे मार्गी लावावीत, अशी अपेक्षा लांडगे यांनी व्यक्त केली आहे.

# कंत्राटी कर्मचाऱ्यांना दिवाळीपूर्वी बोनस अद्यापही नाही

## महापालिकेतील 10,000 पेक्षा अधिक कंत्राटी कर्मचाऱ्यांना बोनस न दिल्याने दिवाळी उत्सवावर परिणाम




**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या आस्थापनेवरील अधिकारी-कर्मचाऱ्यांसह मानधन व कंत्राटी पद्धतीने कामगार काम करतात. त्यांना दिवाळीपूर्वी मासिक वेतन व बोनस अदा करण्याचे आदेश प्रशासनाने दिले आहेत. तरीही अनेक कंत्राटदार बोनस देण्यास टाळटाळ करत आहेत. त्यामुळे बोनसविना आमची दिवाळी गोड कशी होईल, असा प्रश्न कंत्राटी कामगारांकडून उपस्थित केला जात आहे.

सर्वत्र दिवाळीचा सण उत्साहात साजरा केला जातो. दिवाळी सणानिमित्त महापालिकेच्या स्थायी आस्थापनेवर कार्यरत असलेल्या अधिकारी, कर्मचाऱ्यांना बोनस देण्यात येतो. त्यानुसार बोनस कायदा 1965 च्या अधीन राहून महापालिकेच्या विविध विभागात कंत्राटी तत्त्वावर व मानधनावर कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांनादेखील 1 एप्रिल 2024 ते 31 मार्च 2025 या कालावधीतील बोनस दिवाळीपूर्वी अदा करावा, असे आदेश आयुक्तांनी दिले आहेत. मानधन आणि कंत्राटी पद्धतीने कार्यरत असलेल्या कामगारांची दिवाळी उत्साहात व आनंदी व्हावी, या उद्देशाने हे आदेश देण्यात आले आहेत.

दरम्यान, महापालिकेतील बहुतेक कंत्राटदारांनी कामगारांना बोनस अदा केलेला नाही. कोणत्याही विभागाने आजअखेर कामगार कल्याण विभागाकडे बोनस दिल्याचा अहवाल सादर केलेला नाही. महापालिकेत दहा हजारांपेक्षा अधिक कंत्राटी कर्मचारी आहेत. यासह सुरक्षारक्षक तसेच, पाणीपुरवठा, ड्रेनेज, विद्युतविषयक देखभाल-दुरुस्तीच्या कामासाठी आणि वैद्यकीय विभागात कंत्राटी कर्मचारी नेमलेले आहेत. कंत्राटदारांकडून पुरेसे वेतनदेखील अदा केले जात नाही. त्यात दिवाळी बोनस न देता कामगारांना आनंद हिरावून घेण्याचे काम कंत्राटदार करीत आहेत. तो तातडीने देण्याची मागणी होत आहे.

सर्व विभागप्रमुखांनी कार्यवाही करून त्याबाबतचा अहवाल कामगार कल्याण विभागास सादर करावा. तसेच, बोनस अदा करण्याची कार्यवाही न करणाऱ्या संबंधित विभागप्रमुख किंवा कंत्राटदार यांच्यावर कायदेशीर कारवाई केली जाईल, असे कामगार कल्याण विभागाने म्हटले होते.

### बोनस न दिल्यास कंत्राटदारांची बिले थांबविणार

» सर्व विभागातील कंत्राटी कामगारांना दिवाळी बोनस अदा करणे आवश्यक आहे. ज्यांनी बोनस अदा केला आहे. तसेच, ज्या कंत्राटदारांनी बोनस दिलेला नाही. त्याबाबत अहवाल कामगार कल्याण विभागाला जमा झालेला नाही. बोनस दिलेला नसल्यास संबंधित कंत्राटदारांची बिले थांबविण्याची कारवाई केली जाईल, असे महापालिकेचे मुख्य कामगार अधिकारी प्रमोद जगताप यांनी सांगितले.

### अधिकाऱ्यांच्या दालनासमोर काळी दिवाळी साजरी करण्याचा इशारा

» कंत्राटी कर्मचाऱ्यांना नियमानुसार ठेकेदारांनी बोनस दिवाळीपूर्वी देण्याचे आदेश काढण्यात आले. पण, प्रत्यक्षात दिवाळी काही दिवसांवर आली असताना ठेकेदारांनी अद्याप बोनस दिलेला नाही. सर्व कंत्राटी कर्मचाऱ्यांना दिवाळीपूर्वी बोनस न संबंधित विभागाच्या महापालिका अधिकाऱ्यांच्या दालनाबाहेर प्रतिकात्मक पध्दतीने काळी दिवाळी साजरी करण्यात येईल, असा इशारा सामाजिक कार्यकर्ते नीलेश हाके यांनी दिला आहे.

# चित्रकलेतून विद्यार्थ्यांमध्ये मानसिक आरोग्याविषयी जागरूकता

## कासारवाडी महापालिका शाळेतील विद्यार्थ्यांनी घेतला सहभाग; एकूण 89 विद्यार्थी सहभागी



**पिंपरी | प्रतिनीधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या उर्दू प्राथमिक शाळा, कासारवाडी येथे जागतिक मानसिक आरोग्य दिनानिमित्त विद्यार्थ्यांमध्ये मानसिक आरोग्याविषयी जागरूकता निर्माण करण्यात आली. याकरिता शाळेकडून विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात इयत्ता पाचवी ते आठवीतील एकूण ८९ विद्यार्थी सहभागी झाले, तर ३० विद्यार्थ्यांनी चित्रकला स्पर्धेत उत्साहाने भाग घेतला होता.

शाळेच्या मुख्याध्यापिका एस.एस. कुलकर्णी यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत मानसिक आरोग्याचे महत्त्व या विषयावर मार्गदर्शन केले. शाळेच्या समुपदेशक ऋतिका बेलदार यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधून तणावमुक्त राहण्याचे उपाय, आत्मविश्वास वाढविण्याचे मार्ग आणि सकारात्मक विचारसरणी अंगीकारण्याचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून सांगितले.

कार्यक्रमानंतर "मानसिक आरोग्याचे महत्त्व" या विषयावर चित्रकला स्पर्धा घेण्यात आली. विद्यार्थ्यांनी रंगांच्या माध्यमातून मानसिक आरोग्याचे संदेश प्रभावीपणे व्यक्त केले. तसेच विद्यार्थ्यांनी घोषवाक्ये, कविता आणि लघुनाटिका सादर करून कार्यक्रमाला अधिक रंगत आणली. कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थ्यांना योग व ध्यानाचा सराव, तसेच अडचणींच्या वेळी विश्वासू व्यक्तींशी संवाद साधण्याचा सल्ला देण्यात आला. हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी माहितीपूर्ण, प्रेरणादायी आणि सर्वांगीण विकासासाठी उपयुक्त ठरला, असे मत शिक्षक व पालकांनी व्यक्त केले.

# ‘महाराष्ट्र मोटर व्हेइकल ॲग्रिगेटर पॉलिसी’ अधिसूचना पत्र जाहीर

**परिवहन विभागाच्या निर्देशानुसार ओला, उबर, रॅपिडोसारख्या ॲपवर आधारित कंपन्यांना नियमाचे बंधन असताना, कंपन्यांकडून नियमांचे उल्लंघन करण्यात येत असल्याच्या तक्रारी होत्या.**

**पुणे | प्रतिनिधी**

राज्य सरकारने ओला, उबर आणि रॅपिडोसारख्या ॲप आधारित प्रवासी सेवा देणाऱ्या कंपन्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी ‘महाराष्ट्र मोटर व्हेइकल ॲग्रिगेटर पॉलिसी २०२५’ हे नवीन धोरण तयार केले आहे. या धोरणातील नियमावली, मसुद्यावर ऑनलाइन हरकती आणि सूचना मागविण्यात आल्या आहेत. त्यासाठी १७ ऑक्टोबरपर्यंत मुदत देण्यात आली आहे.

परिवहन विभागाच्या निर्देशानुसार ओला, उबर, रॅपिडोसारख्या ॲपवर आधारित कंपन्यांना नियमाचे बंधन असताना, कंपन्यांकडून नियमांचे उल्लंघन करण्यात येत असल्याच्या तक्रारी होत्या. गेल्या दोन ते अडीच महिन्यांपासून ॲपवर आधारित कंपन्यांमध्ये असणाऱ्या चालकांची पिळवणूक होत असल्याने गिग कामगार संघटना, तसेच इतर ॲपवर आधारित व्यवसाय करणाऱ्या रिक्षा, कॅब कारचालकांनी आझाद मैदान येथे संप पुकारला होता. त्यानंतर परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यानी महाराष्ट्र मोटर व्हेईकल ॲग्रिगेटर धोरण नव्याने लागू करण्याचा निर्णय घेतला.

नवीन धोरणानुसार ॲग्रिगेटर कंपन्यांना राज्य परिवहन प्राधिकरण (एसटीए) किंवा प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडून (आरटीओ) परवाना घेणे बंधनकारक असणार आहे. ‘एसटीए’साठी परवाना शुल्क १० लाख रुपये, तर आरटीओसाठी २ लाख रुपये शुल्क निश्चित करण्यात आले असून, परवान्याच्या नूतनीकरणासाठी अनुक्रमे २५ हजार आणि ५ हजार रुपये शुल्क आकारण्यात येणार आहे. तसेच, वाहनांच्या संख्येनुसार अनामत आगाऊ रक्कम भरणे बनंधनकारक करण्यात आले आहे. तसेच प्रवाशांची सुरक्षिता, चालकांचे हक्क आणि सेवा गुणवत्ता सुधारण्यासाठी अनेक तरतुदी समाविष्ट करण्यात आल्या आहेत. राज्य सरकारने ओला, उबर आणि रॅपिडोसारख्या ॲप आधारित प्रवासी सेवा देणाऱ्या कंपन्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी ‘महाराष्ट्र मोटर व्हेइकल ॲग्रिगेटर पॉलिसी २०२५’ हे नवीन धोरण तयार केले आहे. या धोरणातील नियमावली, मसुद्यावर ऑनलाइन हरकती आणि सूचना मागविण्यात आल्या आहेत. त्यासाठी १७ ऑक्टोबरपर्यंत मुदत देण्यात आली आहे




## शुल्क आणि सुविधा

- मागणी वाढल्यास वेळेनुरूप शुल्क (सर्ज मॉडेल) लागू करता येईल, पण शुल्क आधारभूत भाड्याच्या १.५ पटांपेक्षा जास्त नसावे.
- प्रवाशांकडून घेण्यात येणारे ‘कन्व्हिनियन्स फी’ मूळ भाड्याच्या ५ टक्क्यांपेक्षा जास्त नसावी.
- एकूण कपात (कन्व्हिनियन्स फी सहित) मूळ भाड्याच्या १० टक्क्यांपेक्षा पेक्षा जास्त नसावी.
- मराठी, हिंदी आणि इंग्रजी भाषेत ॲप उपलब्ध असावे.
- अपंग प्रवाशांसाठी विशेष सुविधा बंधनकारक.

## वाहन आणि चालकांसाठी तरतुदी

- चालकांना दिवसभरात कमाल १२ तास ॲप वापरण्याची मर्यादा
- किमान १० तास विश्रांती घेणे बंधनकारक
- एक तासाचा ‘मोटिव्हेशनल ट्रेनिंग प्रोग्राम’ पूर्ण करणे आवश्यक
- रिक्षा आणि मोटरकॅब ९ वर्षांपेक्षा जास्त जुने नसावेत, बस ८ वर्षांपेक्षा जास्त जुनी नसावी

> नवीन धोरणामुळे ॲपवर आधारित ॲग्रिगेटर कंपन्यांवर नियंत्रण राहणे शक्य होईल. प्रवासी आणि चालक यांच्यातील संबंध, सुरक्षितता आणि सेवा पारदर्शक होईल. मसुद्यावर नागरिकांना हरकती आणि सूचना प्रादेशिक परिवहन कार्यालय, पुणे येथे rto.12-mh@gov.in या ईमेलवर १७ ऑक्टोबरपर्यंत पाठविता येणार आहे.
>
> - रोहिदास गव्हाणे, कार्यकारी अभियंता, भवन विभाग,

# मेट्रो मार्गिकेला समांतर रस्त्यांचे रुंदीकरण;50 किलोमीटर लांबीच्या सेवा रस्त्यांच्या रुंदीकरणाचा निर्णय

**पीएमआरडीएकडून शिवाजीनगर-हिंजवडी मेट्रो मार्गिकेचे काम हाती घेण्यात आले आहे. येत्या काही महिन्यांत या मार्गावरील मेट्रोची प्रवासी सेवा सुरु होणार आहे.**

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून (पीएमआरडीए) शिवाजीनगर-हिंजवडी मेट्रो मार्गिकेला समांतर असलेला चार पदरी रस्ता सहा पदरी करण्यात येणार आहे. त्यासाठी ६२८ कोटींचा आराखडा पीएमआरडीएने केला आहे. त्यासंदर्भातील निविदा प्रक्रियाही राबविण्यात आली असून, सल्लागाराची नियुक्ती करण्यात येणार आहे.

पीएमआरडीएकडून शिवाजीनगर-हिंजवडी मेट्रो मार्गिकेचे काम हाती घेण्यात आले आहे. येत्या काही महिन्यांत या मार्गावरील मेट्रोची प्रवासी सेवा सुरू होणार आहे. सध्या मेट्रोच्या कामांमुळे मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडी होत आहे. त्यामुळे मेट्रो मार्गिका सुरू झाल्यानंतर सेवा रस्त्यावरून वाहतुकीचे नियोजन करण्याच्या दृष्टीने अस्तित्वातील चार पदरी रस्ता सहा पदरी करण्यात येणार आहे.

या मार्गिकेला समांतर असणारा ५० किलोमीटर लांबीचा रस्ता सिमेंटचा करून तो सहा पदरी केला जाणार आहे. बस बे, सायकल मार्ग, पदपथ आणि दुचाकीं लावण्यासाठी जागाही या माध्यमातून निर्माण करण्यात येणार आहे. त्यासाठी काही ठिकाणी भूसंपादन केले जाणार असल्याची माहिती पीएमआरडीएच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिली.

या प्रकल्पासाठी सर्वेक्षण, रेखांकन करण्यात येणार असून त्यासाठी सल्लागाराची नियुक्तीही करण्यात येणार आहे. या सेवा रस्त्यांचे रुंदीकरण करण्यात येणार असल्याने भविष्यात वाहतूक कोंडी कमी होईल, असा दावा पीएमआरडीएच्या अधिकाऱ्यांकडून करण्यात आला आहे.

बस आणि पूरक सेवेसाठी स्वतंत्र मार्ग, पार्किंगची सुविधा देणे या रुंदीकरणामुळे शक्य होणार असून शेवटच्या टपप्प्यापर्यंत दळणवळण सुलभ करता येणार आहे. प्रकल्पाच्या आराखड्यानुसार ६२८ कोटींचा खर्च अपेक्षित असून त्यामध्ये भूसंपादनाचाही खर्चही समाविष्ट करण्यात आला आहे. मात्र सल्लागाराची नियुक्ती करण्यात आल्यानंतर या खर्चात वाढ होण्याची शक्यता आहे.



## प्रकल्पाला विरोधाची शक्यता ?

- शहरातील खासगी वाहनांची संख्या कमी करण्यासाठी आणि सार्वजनिक वाहतुकीला चालना देण्यासाठी शहरात मेट्रो मार्गिका उभारण्यात येत आहेत. मात्र, या परिस्तितीत मेट्रो मार्गिकेला समांतर रस्त्यांचे रुंदीकरणाला विरोध होण्याची शक्यता आहे.

# शिरूर-जुन्नर परिसरात बिबट्याच्या हल्ल्यांनी हादरली जनता

## गेल्या दहा दिवसांत बिबट्याच्या हल्ल्यांमुळे दोन निरागस चिमुकल्यांचा मृत्यू झाल्याने संपूर्ण परिसरात भीती आणि संतापाचे वातावरण पसरले आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

शिरूर तालुका व जुन्नर परिसरात गेल्या दहा दिवसांत बिबट्याच्या हल्ल्यांमुळे दोन निरागस चिमुकल्यांचा जीव जाण्याची दुर्दैवी घटना घडली आहे. शिरूर तालुक्यातील पिंपरखेड येथे पाच वर्षांची शिवन्या बोंबे हिचा बिबट्याच्या हल्ल्यात मृत्यू झाला, तर काही दिवसांपूर्वी जुन्नर तालुक्यातील कुमशेत येथेही अशाच घटनेत आणखी एका चिमुकल्याचा बळी गेला. या घटनांनी संपूर्ण परिसरात भीतीचे व संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे.

या पार्श्वभूमीवर शिरूर लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी पिंपरखेड येथे भेट देऊन मयत शिवन्या बोंबेच्या कुटुंबाचे सांत्वन केले. यावेळी ते म्हणाले, "दहा दिवसांत दोन लेकरांचे जीव गेले, ही दुर्दैवी बाब आहे. उपाययोजनेसाठी वारंवार पत्रव्यवहार करूनही मुख्यमंत्री कृती आराखड्यासाठी वेळ देऊ शकत नाहीत. महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांना कबुतरांसाठी वेळ आहे, पण आमच्या लेकरांसाठी वेळ नाही, हे अत्यंत खेदजनक आहे."

यावेळी सहाय्यक वनसंरक्षक स्मिता राजहंस आणि वनपरिक्षेत्र अधिकारी निळकंठ गव्हाणे यांच्याकडून घटनेची माहिती घेत खासदार कोल्हे यांनी तातडीने बंदोबस्त करण्याच्या सूचना दिल्या. स्मिता राजहंस यांनी "पिंजऱ्यांची संख्या कमी असल्याने अडचणी येत आहेत" असे सांगितले असता, कोल्हे म्हणाले, "एका चिमुकल्याचा जीव जाणे ही फार मोठी हानी आहे. ही भरून निघू शकत नाही. या संदर्भात पालकमंत्र्यांसोबत लवकरच बैठक असून, मी स्वतः त्यात उपस्थित राहणार आहे. उपाययोजनेसाठी तुम्हाला जे काही आवश्यक आहे ते निर्भीडपणे मांडा."



### ग्रामस्थांचा संताप आणि आंदोलनाची तयारी

» पिंपरखेड येथील ग्रामस्थांनी वनविभागाच्या कारभारावर तीव्र नाराजी व्यक्त केली. "आमचा जीव महत्त्वाचा की बिबट्याचा? आमच्या लेकरांचे संरक्षण प्राधान्याने व्हायला हवे," अशी संतप्त भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली. या पार्श्वभूमीवर, बेल्हे-जेजुरी राज्य मार्गावर येत्या गुरुवारी (दि. १६ ऑक्टोबर) मोठ्या जनआंदोलनाची हाक प्रफुल्ल बोंबे यांनी दिली. या आंदोलनाच्या इशाऱ्यावेळी खासदार अमोल कोल्हे, सहाय्यक वनसंरक्षक स्मिता राजहंस, वनपरिक्षेत्र अधिकारी निळकंठ गव्हाणे आणि मंचर बाजार समितीचे माजी सभापती देवदत्त निकम उपस्थित होते.

### खासदार अमोल कोल्हेंनी दिली भेट

» या गंभीर परिस्थितीची दखल घेत शिरूर लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी पिंपरखेड येथे भेट देऊन मयत शिवन्या बोंबेच्या कुटुंबियांचे सांत्वन केले. यावेळी त्यांनी वनविभागाच्या अधिकाऱ्यांशी चर्चा करत तातडीने उपाययोजना करण्याच्या सूचना दिल्या. ते म्हणाले, "दहा दिवसांत दोन निरागस मुलांचा जीव गेला, ही अत्यंत दुर्दैवी घटना आहे. या समस्येवर उपाययोजना करण्यासाठी मी वारंवार पत्रव्यवहार करत आहे, परंतु मुख्यमंत्री यांना कृती आराखड्यासाठी वेळ नाही. कबुतरांसाठी वेळ असणाऱ्या मुख्यमंत्र्यांना आमच्या लेकरांसाठी वेळ नाही, हे खेदजनक आहे."

### वनविभागाच्या कारभारावर प्रश्नचिन्ह

» यावेळी सहाय्यक वनसंरक्षक स्मिता राजहंस आणि वनपरिक्षेत्र अधिकारी निळकंठ गव्हाणे यांनी खासदार कोल्हे यांना घटनेची माहिती दिली. स्मिता राजहंस यांनी पिंजऱ्यांची कमतरता असल्याने अडचणी येत असल्याचे सांगितले. यावर कोल्हे यांनी तीव्र शब्दांत प्रतिक्रिया देत म्हटले, "एका चिमुकल्याचा जीव जाणे ही फार मोठी हानी आहे. ही भरपाई होऊ शकत नाही. लवकरच पालकमंत्र्यांसोबत मीटिंग आहे, त्यात मी स्वतः उपस्थित राहणार आहे. तुम्ही निर्भीडपणे उपाययोजनांसाठी आवश्यक बाबी मांडा."

# आरक्षण सोडतीने इच्छुकांचे 'पत्ते' जाहीर; युती-आघाडीची वाट न पाहता 'वन-मॅन आर्मी' प्रचार सुरु

## गट-गण आरक्षण सोडतीनंतर जिल्ह्यातील राजकीय वातावरण ढवळून निघाले आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या निवडणुकीसाठी नुकत्याच झालेल्या गट-गण आरक्षण सोडतीनंतर जिल्ह्यातील राजकीय वातावरण ढवळून निघाले आहे. कोणत्या मतदारसंघातील जागा राखीव झाली आणि कोणती खुली झाली, हे स्पष्ट झाल्यामुळे निवडणुकीचे चित्र स्पष्ट झाले आहे. काही गट-गण राखीव झाल्याने काही इच्छुकांनी आपली तलवार म्यान केली आहे, तर अनेक जण उमेदवारीच्या दाव्यासह मैदानात उतरले आहेत. युती किंवा आघाडीची कोणतीही अधिकृत घोषणा नसतानाही, सर्वच पक्षांतील इच्छुक उमेदवारांनी मतदारांच्या गाठीभेटी घेत जोरदार प्रचाराला सुरुवात केली आहे.

पुणे जिल्हा परिषदेमध्ये 73 गट आणि 13 पंचायत समित्यांमध्ये एकूण 146 गण आहेत. या सर्वच जागांवर इच्छुकांची संख्या मोठी आहे.

ज्या मतदारसंघांमध्ये त्यांचे आरक्षण संपुष्टात आले आहे किंवा त्यांना अनुकूल आरक्षण पडलेले नाही, अशा इच्छुकांनी नाइलाजाने निवडणुकीतून माघार घेतल्याचे दिसून येत आहे. तर ज्यांना अनुकूल आरक्षण पडले आहे, अशा इच्छुकांनी कोणताही विलंब न लावता मतदारसंघातून 'मलाच उमेदवारी मिळणार' असा ठाम दावा करत प्रचाराला सुरुवात केली आहे. मतदारसंघातील व्यक्तींच्या गाठीभेटी, कार्यकर्त्यांशी संवाद आणि छोटेखानी बैठका आयोजित करून मतदारांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न सध्या सुरू आहे. यामुळे सर्वच पक्षांतील इच्छुक उमेदवारांनी पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांच्या निर्णयाची वाट न पाहता, मतदारांच्या गाठीभेटी आणि प्रचार सुरू केला आहे. सध्या सुरू असलेल्या या अनौपचारिक प्रचारामुळे निवडणुकीची रंगत वाढली आहे.



### स्वयंघोषित उमेदवारी

» सद्यस्थितीत राज्यात महाविकास आघाडी आणि महायुती यांसारख्या प्रमुख राजकीय आघाड्यांची जिल्हा परिषद -पंचायत समित्यांच्या निवडणुकीसाठी कोणतीही अधिकृत घोषणा झालेली नाही. त्यामुळे काँग्रेस, शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेस, उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना , भाजप, शिवसेना ,राष्ट्रवादी काँग्रेस आणि मनसे अशा सर्वच प्रमुख पक्षातील इच्छुक उमेदवारांनी स्वयंघोषित उमेदवारी जाहीर करत आपल्यालाच तिकिट मिळणार असल्याचा दावा केला. त्यामुळे सोमवारपासूनच इच्छुकांनी मतदारसंघातील प्रतिष्ठीत व्यक्तींची भेट घेत निवडणुकीत साथ देण्याची हाक दिली आहे.